# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग)

**-: सभेचे इतिवृत्त :-**

मा. प्रशासक तथा अध्यक्ष वृक्ष प्राधिकरण समिती, मनपा नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार दिनांक 17.01.2025 रोजी वेळ स. 11.30 वाजता नविन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात संपन्न झालेल्या वृक्ष प्राधिकरण सभेचे इतिवृत्त.

या सभेस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित आहेत.

1) श्रीमती. आंचल गोयल, अति. आयुक्त (शहर)

2) श्री. गणेश राठोड, उपायुक्त (उद्यान) तथा वृक्ष अधिकारी

3) श्री. अमोल चौरपगार, वृक्ष संवर्धक

या सभेत खालील प्रमाणे नमूद विषयावर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.

**विषय क्र. 1**

कार्यालयास दिनांक 19.09.2024 ला प्राप्त मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर यांनी अतिविशेषोपचार रुग्णालय प्रस्तावित नवीन "सी" विंग इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या विविध प्रजातीच्या झाडास कापणी करण्याची परवानगी मिळण्याकरीता विनंती केली होती.

या प्रकरणी पाहणी करण्यात आली असता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथील जागेवर इमारतीचे बांधकाम प्रस्तावित असून या जागेवर असलेल्या **पुरातन (हेरिटेज)** सुबाभूळ-1. रेनट्री-2, केशिया-1, बाभूळ-2, चिचविलाई-1 व **नॉन हेरीटेज** सुबाभूळ-30, जंगली करंजी-5, सप्तपर्णी-5, रेनट्री-2, केशिया-7, बाभूळ-10, सिसम-2, कडूनिम-2, आडजात-1, चिंच-1, काटसावर-1. पळस-1 अशी एकूण (7+67=74) 74 नग झाडे प्रस्तावित इमारतीच्या बांधकामात व खोदकामात अडथळा निर्माण करीत आहेत.

**या प्रकरणी वर्तमान पत्रात जाहिरात क्र. 742/PR अन्वये दिनांक 06.12.2024 ला जाहिरात प्रसिद्ध करून नागरिकांचे आक्षेप मागविण्यात आले असता प्रसिद्ध करण्यात आलेल्या**

जाहिरातीवर 20 नागरिकांचे आक्षेप प्राप्त झाले. त्यानुषंगाने दिनांक 14.01.2025 रोजी आक्षेपकत्यांची सुनावणी घेण्यात आली असून सभेचे इतिवृत्त नस्तीस सलग्न आहे.

या प्रकरणी अर्जदारास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथील जागेवरील प्रस्तावित नवीन "सी" विंग इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या पुरातन (हेरीटेज) 7 व नॉन हेरीटेज 67 अश्या एकूण 74 नग झाडाच्या मोबदल्यात नविन सावलीची 2035 नग झाडांची लागवड करण्याबाबत पत्र देण्यात आले आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथील जागेवरील प्रस्तावित नवीन "सी" विंग इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या **पुरातन (हेरीटेज)** 7 व **नॉन हेरीटेज** 67 अश्या एकूण 74 नग झाडांच्या मोबदल्यात **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग पाच, जुलै 5, 2021/आषाढ 14, शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट कलम (4) (ब) अन्वये कापणी करण्यात येणाऱ्या त्याच जातीचे किंवा इतर कोणत्याही मूळ जातीचे कापणी करण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजीत वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान 6 फुट इतक्या उंचीची 2035 नग नविन झाडांची लागवड करून सात वर्षे देखभाल करणे** या अटीचे पालन होण्यास्तव अर्जदाराकडून **डिपॉझिट रु.** 20,60,000/- व **प्रशासकीय शुल्क रु.** 2,06,000/- असे एकूण रु. 22,66,000/- रक्कम स्विकारण्याच्या अटीवर सदर ठिकाणी असलेली **पुरातन (हेरीटेज)** 07 व **नॉन हेरीटेज** 67 विविध प्रजातीची अशी एकूण 74 नग झाडास जमिनिपासून कापणी करण्याची अनुमती प्रदान करण्याच्या विषयावर सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. या प्रस्तावित बांधकामामध्ये येणारी झाडे वाचविणे शक्य नसून इमारतीच्या बांधकामामध्ये कोणताही बदल होऊ शकत नाही. तसेच याकरिता Environment Clearance ची आवश्यकता नसल्याचे कार्यकारी अभियंता, एकात्मीकृत घटक (वे) सा. बां. नागपूर यांनी दिनांक 16.01.2025 च्या पत्रान्वये कळविले आहे, व दिनांक 17.01.2025 च्या पत्रान्वये अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर यांनी तोडण्यात येणाऱ्या झाडाच्या मोबदल्यात पर्यायी झाडे संस्थेतील परिसरातील रिकाम्या जागेत लावण्यात येईल, व त्या झाडांचे संगोपन करण्याची हमी दिली आहे. प्रस्तावित बांधकाम अस्तित्वात असलेल्या अतिविशेषोपचार रूग्णालयासी संबधित असल्याने रुग्णांसाठी अत्यावश्यक सुविधा उपलब्ध होणार आहे. करीता रूग्णाहीतास्तव इमारतींचे बांधकाम करणे आवश्यक असून अर्जदाराकडून डिपॉझिट रु. 20,60,000/- व प्रशासकीय शुल्क रु. 2,06,000/- असे एकूण रु. 22,66,000/- रक्कम स्विकारण्याच्या अटीवर सदर

ठिकाणी असलेली **पुरातन (हेरीटेज)** 07 व **नॉन हेरीटेज** 67 विविध प्रजातीची अशी एकूण 74 नग झाडास जमिनिपासून कापणी करण्याबाबत वृक्ष प्राधिकरण समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 2**

कार्यालयास दिनांक 09.07.2024 ला प्राप्त संचालक, टेगसूयर हॉस्पीटालिटी एलएलपी नागपूर यांनो मौजा-लॅन्ड्रा, नागपूर येथील खसरा नं. 69, प्लॉट नं. 420 ए या जागेवरील प्रस्तावित इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या विविध प्रजातीच्या झाडास कापणी करण्याची परवानगी मिळण्याकरीता विनंती केली होती.

या प्रकरणी पाहणी करण्यात आली असता, खसरा नं. 69, प्लॉट नं. 420 ए, मोजा-लॅन्ड्रा, नागपूर येथील जागेवर इमारतीचे बांधकाम प्रस्तावित असून या जागेवर असलेल्या **पुरातन (हेरिटेज)** कवठ-1 व **नॉन हेरीटेज** कडूनिम-1 व अशोका-1 अशी एकूण (1+2=3) 3 नग झाडे प्रस्तावित इमारतीच्या बांधकामात व खोदकामात अडथळा निर्माण करीत आहेत.

**या प्रकरणी वर्तमान पत्रात जाहिरात क्र. 788/PR अन्वये दिनांक 20.12.2024 ला जाहिरात प्रसिद्ध करून नागरिकांचे आक्षेप मागविण्यात आले असता प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीवर श्री. सचिन खोब्रागडे यांचे आक्षेप प्राप्त झाले.** त्यानुषंगाने दिनांक 07.01.2025 रोजी आक्षेपकर्त्यास सुनावणीकरिता कार्यालयास हजर राहण्याबाबत कळविले असता आक्षेपकर्ता प्रत्यक्ष सुनावणीस गैरहजर राहिले.

या प्रकरणी अर्ज़दारास खसरा नं. 69, प्लॉट नं. 420 ए, मौजा-लॅन्ड्रा, नागपूर येथील जागेवरील प्रस्तावित इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या पुरातन (हेरीटेज) 1 व नॉन हेरीटेज 2 अश्या एकूण 3 नग झाडाच्या मोबदल्यात नविन सावलीची 121 नग झाडांची लागवड करण्याबाबत पत्र देण्यात आले आहे.

खसरा नं. 69, प्लॉट नं. 420 ए, मौजा लेंन्ड्रा, नागपूर येथील जागेवरील प्रस्तावित इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या पुरातन (हेरीटेज) 1 व नॉन हेरीटेज 2 अश्या एकूण 3 नग झाडाच्या मोबदल्यात **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग पाच, जुलै 5, 2021/आषाढ 14, शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट कलम (4) (ब) अन्वये कापणी करण्यात येणाऱ्या त्याच जातीचे किंवा इतर कोणत्याही मूळ जातीचे कापणी करण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजीत वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान 6 फुट इतक्या उंचीची 121 नग**

**नविन झाडांची लागवड करून सात वर्षे देखभाल करणे** या अटीचे पालन होण्यास्तव अर्जदाराकडून डिपॉझिट रु. 1,21,000/- व प्रशासकीय शुल्क रु. 12,100/- असे एकूण रु. 1,33,100/- रक्कम स्विकारण्याच्या अटीवर सदर ठिकाणी असलेली पुरातन (हेरीटेज) कवठ एक व नॉन हेरीटेज कडूनिम एक व अशोका एक अशी एकूण 3 नग झाडास जमिनिपासून कापणी करण्याबाबतचा विषय सभेत चर्चा करण्यात आली. **अर्जदाराने सदर तोडण्यात येणाऱ्या झाडांच्या मोबदल्यात पर्यायी 121 नग वृक्ष झुलेलाल NIT उद्यान, जरीपटका, नागपूर या परिसरात लावण्यात आलेली असून तसा नियोजन आराखडा कार्यालयात सादर केला आहे.** करीता वरील नमूद अटीवर सदर ठिकाणच्या पुरातन (हेरीटेज) कवठ-1 व नॉन हेरीटेज कडूनिम एक व अशोका एक अशी एकूण 3 नग झाडास जमिनिपासून कापणी करण्याबाबत वृक्ष प्राधिकरण समितीने एकामताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 3**

कार्यालयास दिनांक 03.12.2024 ला प्राप्त श्री. पंकज निंबाळकर, प्लॉट नं. 19, वर्धा रोड, नागपूर यांनो प्लॉट नं. 19, हिन्दुस्तान कॉलोनी, साई मंदीर समोर, वर्धा रोड, नागपूर या जागेवरील प्रस्तावित हॉस्पीटलच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या विविध प्रजातीच्या एकूण 04 झाडास जमिनीपासून कापणी करण्याची परवानगी मिळण्याकरीता विनंती केली होती.

या प्रकरणी पाहणी करण्यात आली असता, प्लॉट नं. 19, हिन्दुस्तान कॉलोनी, साई मंदीर समोर, वर्धा रोड, नागपूर येथील जागेवर हॉस्पीटच्या इमारतीचे बांधकाम प्रस्तावित असून या जागेवर असलेल्या आंबा-1 (हेरिटेज) व आंबा-1 केशिया 2, (नॉन हेरिटेज) अशी एकूण 04 नग झाडे प्रस्तावित इमारतीच्या बांधकामात व खोदकामात अडथळा निर्माण करीत आहेत.

**या प्रकरणी वर्तमान पत्रात जाहिरात क्र. 752/ PR दिनांक 09.12.2024 ला जाहिरात प्रसिध्द करून नागरिकांचे आक्षेप प्राप्त झाले. त्याअनुषंगाने दिनांक 01.01.2025 रोजी सुनावणी झाली असून आक्षेपकर्त्यांस प्रत्यक्ष स्थळी पाहणी करून झाडे प्लॉन नुसार कसे बांधकामात येतात दाखविण्यात आले असता आक्षेपकर्त्याकडून परवानगी देण्यास ना हरकत असल्याबाबतचा अहवाल सदर नस्तीस सलग्न आहे.**

या प्रकरणी अर्जदारास प्लॉट नं. 19. हिन्दुस्तान कॉलोनी, साई मंदीर समोर, वर्धा रोड, नागपूर येथिल जागेवरील प्रस्तावित हॉस्पीटलच्या इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या आंबा-1 (हेरिटेज) व आंबा 1, केशिया 2, (नॉन हेरिटेज) अशी एकूण 04 नग झाडांच्या मोबदल्यात नविन सावलीची

160 नग झाडांची लागवड करण्याबाबत पत्र देण्यात आले असून लागवड व देखभाली बाबत नियोजन सादर केले आहे.

प्लॉट नं.19, हिन्दुस्तान कॉलोनी, साई मंदीर समोर, वर्धा रोड, नागपूर येथिल जागेवरील प्रस्तावित हॉस्पीटलच्या इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या आंबा-1 **(हेरिटेज)** व आंबा 1. केशिया 2, **(नॉन हेरिटेज)** अशी एकूण 04 नग झाडांच्या **मोबदल्यात महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग पाच. जुलै 5. 2021/आषाढ 14 शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट कलम (4) (ब) अन्वये कापणी करण्यात येणाऱ्या त्याच जातीचे किंवा इतर कोणत्याही मुळ जातीचे कापणी करण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजीत वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान 6 फुट इतक्या उंचीची 160 नग नविन झाडांची लागवड करून सात वर्षे देखभाल करणे** या अटीचे पालन होण्यास्तव अर्जदाराडून डिपॉझिट रु. 160,000/- व प्रशासकीय शुल्क रू. 16,000/- असे एकूण रू. 1,76,000/- रक्कम स्विकारण्याच्या अटीवर सदर ठिकाणची आंबा 1 (हेरिटेज) व आंबा 1. केशिया-2, (नॉन हेरिटेज) अशी एकूण 04 नग झाडास जमिनीपासून कापणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याबाबत सविस्तर चर्चा होऊन **अर्जदाराने पर्यायी नविन 60 वृक्ष NIT उद्यान वकीलपेठ व 100 नग वृक्ष NIT उद्यान आशिर्वाद नगर या परिसरात लागवड केली** असल्याने वरील अटी शर्ती वर सदर ठिकाणची पुरातन (हेरीटेज) आंबा-1 व नॉन हेरीटेज आंबा-1 व केशिया-2 अश्या एकूण 4 नग झाडास जमिनीपासून कापणी करण्याबाबत वृक्ष प्राधिकरण समितीने एकामताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 4**

**अर्जदाराचे नाव:-** श्री. राकेश ठाकरे

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 17.12.2024

**झाडाची प्रजाती :-** 1) कडूनिम-1. झाडाची गोलाई-64 इंच, 62 वर्ष (हेरीटेज).

2) महारुख-1. झाडाची गोलाई-91 इंच. 88 वर्ष. (हेरीटेज).

**झाडाचे विवरण:-** गायत्री भवन शंभू सोसायटी, दाभा, नागपूर येथील परिसरात रस्त्यालगत असलेल्या एक कडूनिम व महारुख वृक्षाच्या विद्युत तारेवर व परिसरात रोडवर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याबाबतचा विषय सभेत चर्चा करण्यात आला. चर्चेअंती विषयाकिंत वृक्षांच्या फांद्या विद्युत तारेवर व रोडवर धोकादायक झुकलेल्या असल्याने या वृक्षांच्या फांद्यांची छाटणी करण्याबाबत एकमताने समितीने मान्य करून फांद्या कापण्याची अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 5

**अर्जदाराचे नाव** :- श्री. अरुण बापूराव मोगरकर

**अर्जाचा प्राप्त दिनांक**:- 02.12.2024

**झाडाची प्रजाती** :- 1) आंबा -1, झाडाची गोलाई-75 इंच, 72 वर्ष (**हेरीटेज**).

**प्रशासकीय शुल्क** :- रु. 500/-

**झाडाचे विवरण** :- प्लॉट नं. 489 हॉटेल तूली जवळ, रामदासपेठ, नागपूर येथील घरपरिसरात असलेल्या एक आंबा वृक्षाच्या विद्युत तारेवर व परिसरात रोडवर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याबाबत मंजुरी प्रदान करण्याच्या विषयावर समितीत साधकबाधक चर्चा होऊन वृक्षाच्या विद्युत तारेवर व परिसरात रोडवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्यास समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 6

**अर्जदाराचे नाव**:- श्री. वरून पिंगळे

**अर्जाचा प्राप्त दिनांक** :- 02.12.2024

**झाडाची प्रजाती** :- 1) सिसम-1, झाडाची गोलाई-89 इंच, 86 वर्ष (**हेरीटेज**).

2) सप्तपर्णी-1, झाडाची गोलाई-51 इंच, 49 वर्ष (**हेरीटेज**).

**झाडाचे विवरण** :- अयोध्या विल्डिंग, कर्नाटक संघ बिल्डींग जवळ, रामनगर, नागपूर येथील रोडलगत असलेल्या एक सिसम व एक सप्तपर्णी वृक्षाच्या विद्युत तारेवर व परिसरात रोडवर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याबाबतच्या मंजुरी प्रदान करण्याचा विषयावर समितीत साधकबाधक चर्चा होऊन या पुरातन (हेरीटेज) एक सिसम व एक सप्तपर्णी वृक्षाच्या विद्युत तारेवर व परिसरात रोडवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्यास समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 7

**अर्जदाराचे नाव**:- श्री. संजय शेंडे

**अर्जाचा प्राप्त दिनांक**:- 25.11.2024

**झाडाची प्रजाती** :- पिंपळ-1, झाडाची गोलाई-120 इंच, 118 वर्ष (**हेरीटेज**).

**झाडाचे विवरण** :- नयी बस्ती पचमेडी, प्रभाग क्र. 10, नागपूर येथील मंदिर परिसरात असलेल्या एक पिंपळ वृक्षाच्या परिसरात रोडवर व घराच्या छतावर झुकलेल्या फांद्या पडून कुठलीही वित्त हानी किंवा अपघात होऊ नये, याकरिता समितीने एकमताने पुरातन (हेरीटेज) एक पिंपळ वृक्षाच्या परिसरात झुकलेल्या फांद्यांचो छाटणी करण्यास अनुमती प्रदान केली आहे.

**विषय क्र. 8**

**अर्जदाराचे नाव** :- श्री. विनोद तिवारी, राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, नागपूर शहर.

**अर्जाचा प्राप्त दिनांक**:- 21.11.2024

**झाडाची प्रजाती** :- 1) गुलमोहर -2, झाडाची गोलाई-61-68 इंच, झाडाची वय- 59-66 वर्ष (हेरीटेज).

2) आजन -1, झाडाची गोलाई-84 इंच, झाडाची वय- 81 वर्ष (हेरीटेज).

3) कडूनिम-1, झाडाची गोलाई-51 इंच, झाडाची वय- 49 वर्ष (हेरीटेज).

4) चिचवा -1, झाडाची गोलाई-48 इंच, झाडाची वय- 46 वर्ष (हेरीटेज).

5) सुबाभूळ -2, झाडाची गोलाई-45-51 इंच, झाडाची वय- 43-49 वर्ष (हेरीटज).

**प्रशासकीय शुल्क** :- **रु.** 3,500/-

**झाडाचे विवरण** :- पोलीस मुख्यालय, काटोल रोड, नागपूर येथील परिसरात असलेल्या वर नमूद विविध प्रजातीच्या झाडाच्या परिसरात झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची अनुमती प्रदान करण्याच्या विषयावर समितीत सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती वरील ठिकाणी कर्मचाऱ्यांची व वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असल्याने या वृक्षांच्या फांद्या पडून कुठलीही वित्त हानी किंवा अपघात होऊ नये. करिता या समितीने एकमताने वरील वृक्षांच्या फांद्या छाटणी करण्याची अनुमती प्रदान केली आहे.

**विषय क्र. 9**

**अर्जदाराचे नाव** :- कुकरेजा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि.

**अर्जाचा प्राप्त दिनांक**: 26.11.2024

**झाडाची प्रजाती** :- 1) केशिया-1, झाडाची गोलाई-108 इंच, झाडाची वय-104 वर्ष (हेरीटेज).

2) जंगली-1, झाडाची गोलाई-96 इंच, झाडाची वय-93 वर्ष (हेरीटेज).

3) गुलमोहर-1, झाडाची गोलाई-72 इंच, झाडाची वय- 69 वर्ष (हेरीटेज).

4) वकुळ-1, झाडाची गोलाई-75 इंच, झाडाची वय- 73 वर्ष (हेरीटेज).

5) जंगली करंजी-1, झाडाची गोलाई-64 इंच, झाडाची वय- 62 वर्ष (हेरीटज).

**प्रशासकीय शुल्क** :- रु. 2,500/-

**झाडाचे विवरण** :- गुप्ता हाउसच्या बाजूला कुकरेजा इफास्ट्रक्चरच्या ऑफिश परिसरात असलेल्या वर नमूद विविध प्रजातीच्या 5 नग वृक्षांच्या परिसरात झुकलेल्या फांशा छाटणी करण्याबावतच्या विषयावर समितीत साधकचाधक चर्चा होऊन वरील नमूद वृक्षांच्या बाजूस झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्यास समितीने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 10

**अर्जदाराचे नाव:**- श्रीमती, शालिनी अरोरा

**अर्जाचा प्राप्त दिनांक:**- 26.11.2024

**झाडाची प्रजाती** :- पिंपळ-1, झाडाची गोलाई-125 इंच झाडाची वय-120 वर्ष (हेरीटेज).

**प्रशासकीय शुल्क** :- रु. 500/-

**झाडाचे विवरण** :- प्लॉट नं. 212 व 212 अ. सिव्हिल लाईन्स, नागपूर येथील परिसरात असलेल्या एक पिंपळ प्रजातीच्या झाडाच्या अर्जदाराच्या परिसरात झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याबाबतच्या विषयावर समितीत साधकाधक चर्चा होऊन या वृक्षाच्या परिसरात इमारतीकडील बाजूस झुकलेल्या फांद्या कापणी करण्यास समितीने अनुमती प्रदान केली

**विषय क्र.** 11

**अर्जदाराचे नाव:**- श्री. विशाल चंद्रशेखर तिवारी

**अर्जाचा प्राप्त दिनांक:**- 02.12.2024

**झाडाची प्रजाती** :-1) पिंपळ-1, झाडाची गोलाई-123 इंच, झाडाची वय-120 वर्ष (हेरीटेज).

2) पिंपळ-1, झाडाची गोलाई-123 इंच, झाडाची वय-120 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण** :- प्लॉट नं. 84. RSS ग्राउंड, गांधीनगर, नागपूर येथील परिसरात असलेल्या एक पिपळ व आंबा प्रजातीच्या झाडाच्या घरपरिसरात व रोडवर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याबाबतच्या विषयावर सभेत साधकाधक चर्चा होऊन सदर झाडाच्या घरपरिसरात व रोडवर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 12

**अर्जदाराचे नाव:**- श्री. संजीव सुधाकर काळकर

**अर्जाचा प्राप्त दिनांक:** 10.12.2024

**झाडाची प्रजाती :-** आंबा-1. झाडाची गोलाई-88 इंच, झाडाची वय-85 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं. 114, निर्मला पूजा अपार्टमेंट, शिवाजी सभागृह जवळ, नागपूर येथील परिसरात असलेल्या आंबा प्रजातीच्या वृक्षाच्या घरपरिसरात व इमारतीकडील बाजूस झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याबाबतच्या विषयावर समितीत साधकाधक चर्चा होऊन या वृक्षाच्या परिसरातच इमारतीकडील बाजूस शुकलेल्या फांद्या कापणी करण्यास समितीने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 13

**अर्जदाराचे नाव:-** श्री. कमलनारायण नामपल्लीवार

**अर्जाचा प्राप्त दिनांक:-** 02.12.2024

**झाडाची प्रजाती :- कडूनिम-1, झाडाची गोलाई-168 इंच, झाडाची वय-163 वर्ष (हेरीटेज),**

**झाडाचे विवरण :-** मॉईल ऑफिस समोर, बब्यु गलीकरा ला लागून रोडलगत असलेल्या एक कडूनिम वृक्षाच्या इमारतोकडील बाजूस धोकादयाकरित्या झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याबाबत समितीत चर्चा करण्यात आली. या रस्त्यावर वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असल्याने इमारतीकडील बाजूस धोकादयाकरित्या झुकलेल्या फांद्या पडून कुठलीही वित्त हानी होऊ नये. करीता इमारतीकडील बाजूस धोकादयाकरित्या झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची या समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 14

**अर्जदाराचे नाव:-** श्री. डॉ. जयंत आर, मेश्राम

**अर्जाचा प्राप्त दिनांक :** 06.12.2024

**झाडाची प्रजाती :-** 1) पिंपळ-1. झाडाची गोलाई-66 इंच झाडाची वय-63 वर्ष (हेरीटेज).

2) उंबर- ।, झाडाची गोलाई-145 इंच, झाडाची वय-140 वर्ष (हेरीटेज),

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं. 240/241, श्याम ऑपटीकल्स समोर, कुम्बीपुरा कामठी रोड, नागपूर येथील रोडलगत असलेल्या एक आंबा व एक उंबर झाडाच्या इमारतीकडील बाजूस व रोडवर झुकलेल्या झाडाच्या फांद्या छाटणी करण्याबाबतच्या विषयावर समितीत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती या झाडाच्या इमारतीकडील बाजूस व रोडवर झुकलेल्या फांद्या कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 15

**अर्जदाराचे नाव:-** श्री. जगदीश मोती राम जोशी

**अर्जाचा प्राप्त दिनांक:-** 05.12.2024

**झाडाची प्रजाती :-** सिसम-1, झाडाची गोलाई-101 इंच, झाडाची वय-96 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं. 180, गुरुकृया प्लायवूड समोर, गोकुळपेठ, नागपुर येथील रोडलगान असलेल्या एक सिसम झाडाच्या रोडवर चोकादयाकरित्या झुकलेल्या झाडाच्या फांद्या छाटणी करण्याची समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**विषय क्र. 16**

**अर्जदाराचे नाव :-** संरक्षण सहाय्यक, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण नागपुर उपमंडल, नागपुर

**अर्जाचा प्राप्त दिनांक:-** 02.12.2024

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ-2. झाडाची गोलाई-65-70 इंच झाडाची वय-62-67 वर्ष (हेरीटेज)

वड-1. झाडाची गोलाई-75 इंच झाडाची वय-72 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** सिव्हिल लाईन्स, नागपूर येथील जुना उच्च न्यायालय भवन परिसरात असलेल्या एक वड व दोन पिंपळ झाडाच्या परिसरात झुकलेल्या झाडाच्या फांद्या छाटणी करण्याबाबतच्या विषयावर समितीत साधकवाधक चर्चा होऊन या झाडाच्या इमारतीवर व परिसरात झुकलेल्या फांद्यांची कापणी करण्याची समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**विषय क्र. 17**

**अर्जदाराचे नाव :-** श्रीमती. ममता महेश शहारे, माजी नगरसेविका प्रभाग क्र. 9

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 03.01.2025

**झाडाची प्रजाती :-** 1) जांभूळ-1, झाडाची गोलाई 57 इंच, झाडाची वय-55 वर्ष (हेरीटेज).

2) शेमल-1, झाडाची गोलाई 105 इंच, झाडाची वय-101 वर्ष (हेरीटेज).

3) आंबा-2, झाडाची गोलाई- 28-63 इंच, झाडाची वय-26-61 वर्ष (हेरीटेज).

4) पिंपळ-1, झाडाची गोलाई- 100 इंच, झाडाची वय-97 वर्ष (हेरीटेज).

5) आंबा-1. झाडाची गोलाई 65 इंच, झाडाची वय-63 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** मंगळवारी झोन क्र. 10 अंतर्गत येत असलेल्या प्रभाग क्र. 9 क. अंतर्गत येत असलेल्यला विविध ठिकाणी असलेल्या नागरिकांच्या घरपरिसरात व रोडलगत असलेल्या वर नमूद विविध प्रजातीच्या झाडाच्या इमारतीवर व रोडवर, विद्युत तारेवर व परिसरात झुकलेल्या फांद्याची छाटणी

करण्याबाबतच्या विषयावर समितीत साधकबाधक चर्चा होऊन वरील नमूद झाडाच्या इमारतीवर व रोडवर, विद्युत तारेवर व परिसरात झुकलेल्या फांद्यांची कापणी करण्याची समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

## विषय क्र. 18

**अर्जदाराचे नाव:-** श्री. सबरुद्दीन खान

**अर्जाचा प्राप्त दिनांक:-** 24.12.2024

**झाडाची प्रजाती :-** 1) गुलमोहर 3. आडाची गोलाई-57-97 ईथ, झाडाची वप-55-93 वर्ष (हेरीटेज)
2) कडूनिम-2, झाडाची गोलाई-64-67 इंच आडाची वय-61-64 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** युनिव्हर्सल स्कूल रोड, मानकापूर नागपूर येथील रोडलगत असलेल्या दोन गुलमोहर झाडाच्या रोडवर व परिसरात झुकलेल्या झाडाच्या फांद्या छाटणी व एक बोकादायक असलेल्या एक पोकळ गुलमोहर झाडास जमिनीपासून अंदाजे 10 फूट अंतर सोडून वरील भागाची कापणी तसेच जाफर नगर जे. के. इलेक्ट्रिक दुकान समोर, काटोल रोड, नागपूर येथील परिसरात असलेल्या पुरातन (हेरीटेज) दोन कडूनिम झाडाच्या विद्युत तारेवर व रोडवर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

## विषय क्र. 19

**अर्जदाराचे नाव:-** श्री. प्रकाश डी. इंदूरकर

**अर्जाचा प्राप्त दिनांक:-** 23.12.2024

**झाडाची प्रजाती :-** रेनट्री-1, झाडाची गोलाई-112 इंच, झाडाची वय-108 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** प्रभाग क्र. 9, ड, आनंद रोड, इंदोरा स्मारकाच्या मागे, 10 नं. पूल नागपूर येथील रोडलगत असलेल्या एक रेनट्री झाडाच्या रोडवर व अर्जदाराच्या इमारतीवर धोकादयाकरित्या झुकलेल्या झाडाच्या फांद्या छाटणी करण्याबाबतच्या विषयावर समितीत चर्चा करण्यात आली. चचेअंती या झाडाच्या रोडवर व अर्जदाराच्या इमारतीवर धोकादयाकरित्या झुकलेल्या फांद्या कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

## विषय क्र. 20

**अर्जदाराचे नाव :-** श्री. टीमराज गेडाम,

**अर्जाचा प्राप्त दिनांक:-** 23.12.2024

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ-1, झाडाची गोलाई-94 इंच, झाडाची वय-91 वर्ष (हेरीटेज).

**प्रशासकीय शुल्क :-** रु. 500/-

**झाडाचे विवरण :-** बहुजन हिताय वसतिगृह गोरेवाडा बस्ती, नागपूर पंचोल परिसरात असलेल्या एक पिंपळ झाडाच्या इमारतीवर व परिसरात झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याबाबत मंजूरी प्रदान करण्याचा विषयावर समितीत साधक बाधक चर्चा होऊन चर्च अंती पुरातन (हेरीटेज) एक पिंपळ झाडाच्या इमारतीवर व परिसरात झुकलेल्या फांद्या कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 21

**अर्जदाराचे नाव:-** अध्यक्ष दर्पण गाळेधारकांची गृहनिर्माण संस्था, मानकापूर

**अर्जाचा प्राप्त दिनांक:-** 10.12.2024

**झाडाची प्रजाती:-** कडूनिम, झाडाची गोलाई-79 इंच झाडाची वय-76 वर्ष (हेरीटेज)

गुलमोहर-।, झाडाची गोलाई-35 इंच झाडाची वय-33 वर्ष (नॉन हेरीटेज).

**प्रशासकीय शुल्क** रु. 1,000/-

**झाडाचे विवरण:-** दिपिरीन एन्क्लेव्ह, सेंट मेरो शाळेसमोर, मानकापूर, नागपूर येथील परिसरात असलेल्या एक गुलमोहर झाडाच्या परिसरात व एक धोकादयाकरीत्या झुकलेल्या एक कडूनिम झाडास जमिनीपासून अंदाजे 15 फूट अंतर सोडून वरील भागाची कापणी करण्याबाबत या समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 22

**अर्जदाराचे नाव:-** सचिव, विजय अपार्टमेंट, गोरपेठ, नागपुर

**अर्जाचा प्राप्त दिनांक:-** 10.12.2024

**झाडाची प्रजाती:-** 1) आकाशनिम-4, झाडाची गोलाई-79-86 इंच, झाडाची यय-76-84 वर्ष (हेरीटेज).

2) शेमल-1. झाडाची गोलाई-97 इंच, झाडाची यय-94 वर्ष (हेरीटेज).

3) कडूनिम-1 झाडाची गोलाई-89 इंच, झाडाची यय-86 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** गोरेपेठ, नागपूर येथील प्लॉट नं. 118 विजय अपार्टमेंट च्या सुरक्षाभिती समोर रोडलगत असलेल्या वर नमूद विविध प्रजातीच्या झाडांची अंदाजे उंची 35 फुटाच्या वर असून झाडे धोकादयाकरीत्या इमारतीकडील बाजूस झुकलेले असल्याने या झाडास जमिनीपासून अंदाजे 15 फुट अंतर सोडून वरील भागाची कापणी करण्याबाबत मंजूरी प्रदान करण्याच्या विषयावर चर्चा करण्यात आली. चर्चे अंती वरील झाडे धोकादायकरीत्या झुकलेले असल्याने पडून इमारतीला कुठलाही नुकसान होऊ नये.

करिता एकमताने या समितीने या झाडास जमिनीपासून अंदाजे 15 फुट अंतर सोडून वरील भागाची कापणी करण्याची अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 23**

**अर्जदाराचे नाव:-** श्री. भीमरायनि वानखेडे

**अर्जाचा प्राप्त दिनांक:-** 11.10.2024

**झाडाची प्रजाती:-** पिंपळ, गोलाई-135 इंच, 130 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं. 29, नवीन सुबेदार ले आउट, नागपूर येथील परिसरात असलेल्या असलेल्या पुरातन (हेरीटेज) एक पिंपळ झाडाच्या रोडवर, परिसरात, घरावर व इलेक्ट्रिक तारेवर धोकादायकरित्या झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची समितीने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 24**

**अर्जदाराचे नाव :-** अमर नगर सुधार समिती

**अर्जाचा प्राप्त दिनांक:-** 7.12.2024

**झाडाची प्रजाती :-** वळ, गोलाई-120 इंच, 117 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** शिव हनुमान मंदिर, अमर नगर, नागपूर येथील श्रीहनुमान मंदिर परिसरात असलेल्या पुरातन (हेरीटेज) एक वळ झाडाच्या विद्युत तारेवर व मंदिरावर धोकादायकरित्या झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याबाबत समितीत साधक बाधक चर्चा करण्यात होऊन वरील वळ झाडाच्या विद्युत तारेवर व मंदिरावर चोकादायकरित्या झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची समितीने मंजूरी प्रदान केली.

**विषय क्र. 25**

**अर्जदाराचे नाव:** - श्री. राजू नारायण पोनीकर,

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 08.01.2024

**झाडाची प्रजाती :-** **पिंपळ, गोलाई-124 इंच, 120 वर्ष (हेरीटेज)**

**प्रशासकीय शुल्क रु. :-** 500/-

**झाडाचे विवरण :-** पिल्लू पांडा मंदिर, पंडरी सावजी भोजनालय जवळ टिमकी, नागपूर येथील श्री. राजू नारायण पौनीकर यांच्या घरसमोरील परिसरात रोडलगत असलेल्या पुरातन (हेरीटेज) एक पिंपळ झाडाच्या रोडवर व अर्जदार यांच्या इमारतीवर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याबाबतचा विषय मंजुरी

प्रदानकरण्याच्या विषयावर समितीत चर्चा करण्यात आली व चर्चेअंती पुरातन (हेरीटेज) एक पिपळ झाडाच्या रोडवर व अर्जदार यांच्या इमारतीवर झुकलेल्या फांद्या कापणी करण्याची समितीने एकामताने समितीने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 26**

**अर्जदाराचे नाव:-** श्रीमती. नाजनीन सय्यद

**अर्जाचा प्राप्त दिनांक:-** 07.01.2024

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ, गोलाई-149 इंच, 145 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** भालदार पुरा, छोटा लोधोपुरा सर सय्यद लायब्ररी जवळ नागपूर येथील श्रीमती. नाजनीन सय्यद यांच्या घरा समोरील परिसरात असलेल्या पुरातन (हेरीटेज) एक पिंपळ झाडाच्या अर्जदार यांच्या इमारतोचर, व परिसरात झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याचावतचा विषय मंजूरी प्रदान करण्याच्या विषयावर समितीत चर्चा करण्यात आली व चर्चेअंती पुरातन (हेरीटेज) एक पिंपळ झाडाच्या अर्जदार यांच्या इमारतीवर, व परिसरात झुकलेल्या फांद्या कापणी करण्याची समितीने एकामताने समितीने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 27**

**अर्जदाराचे नाव :- श्री. आनंद कुलकर्णी.**

**अर्जाचा प्राप्त दिनांक:-** 10.12.2024

**झाडाची प्रजाती :- आंबा, गोलाई-89इंच, 86 वर्ष (हेरीटेज)**

**प्रशासकीय शुल्क रु. :- 500/-**

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं.56, काशी नगर, रामेश्वरी, नागपूर येथील श्री. आनंद कुलकर्णी यांच्या घर परिसरात असलेल्या पुरातन (हेरीटेज) एक आंबा झाडाच्या रोडवर व अर्जदार यांच्या इमारतीवर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याबाबतच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील झाडाच्या रोडवर व अर्जदार यांच्या इमारतीवर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 28**

**अर्जदाराचे नाव:-** श्री. भरत देविदास बेसवारे

**अर्जाचा प्राप्त दिनांक:-** 03.11.2024

**झाडाची प्रजाती:-** पिपळ, गोलाई-108 इंच, 104 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** भगवाधर चौक, शनी मंदिर जवळ, नागपूर येथील श्री. भरत देविदास बेसवारे यांच्या घरा समोरील परिसरात असलेल्या पुरातन (हेरीटेज) एक पिपळ झाडाच्या अर्जदार यांच्या इमारतीवर, व परिसरात झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याबाबतचा विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील झाडाच्या अर्जदार यांच्या इमारतीवर व परिसरात झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 29**

**अर्जदाराचे नाव :-** श्रीमती. ममताताई भोयर (सतीश होले)

**अर्जाचा प्राप्त दिनांक:** 26.11.2024

**झाडाची प्रजाती :-** वड, गोलाई-280 इंच, 271 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण:-** प्लॉट नं. 380, आराधना ज्वेलर्स, शारदा चौक, नागपूर येथील श्रीमती. ममताताई भोयर (सतोश होले) यांच्या घरा समोरील परिसरात असलेल्या पुरातन (हेरीटेज) वड झाडाच्या अर्जदार यांच्या इमारतीवर, परिसरात व इलेक्ट्रिक तारेवर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 30**

**अर्जदाराचे नाव:-** श्री. गजानन मुळे

**अर्जाचा प्राप्त दिनांक:-** 27.11.2024

**झाडाची प्रजाती :-** वड, गोलाई-78 इंच, 75 वर्ष (हेरीटेज)

**प्रशासकीय शुल्क रु. :-** 500/-

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं. 83/292, सिरसपेठ नागपूर, येथील श्री. गजानन मुळे यांच्या ताक्रारीन्ये घर परिसरात असलेल्या पुरातन (हेरीटेज) वड झाडाच्या अर्जदार यांच्या इमारतीवर, परिसरात व इलेक्ट्रिकतारेवर झुकलेले असल्याने या झाडाच्या अर्जदार यांच्या इमारतीवर, परिसरात व इलेक्ट्रिक तारेवर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 31**

**अर्जदाराचे नाव:-** श्री. दिनेश किशोर कातुरे.

**अर्जाचा प्राप्त दिनांक:** 22.11.2024

**झाडाची प्रजाती :-** वड, झाडाची गोलाई 182 इंच, झाडाची वय 176 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** सावजी गल्ली. OCW ऑफिस मागे, जागनाच बुधवारी, नागपूर, येवील श्री. दिनेश किशोर कालूरे यांच्या घरासमोर असलेल्या एक पुरातन (हेरीटेज) वड झाडाच्या इमारतीवर व परिसरात झुकलेल्या फांद्यांची कापणी करण्याबाबतचा मंजुरी प्रदान करण्याच्या विषयावर समितीत चर्चा करण्यात आली व चर्चेअंती वरील वृक्षाच्या इमारतीवर, परीसरात व रोडवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकामताने समितीने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 32

**अर्जदाराचे नाव:-** श्री. महेंद्र सिंग चव्हाण.

**अर्जाचा प्राप्त दिनांक:-** 27.11.2024

**झाडाची प्रजाती :-** पिपळ, गोलाई 144 इंच, झाडाची वय 139 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** जुनी रेशम ओळी, माहेश्वरी भवन, इतवारी, नागपूर, येथील माहेश्वरी भवन घसमोरील परिसरात असलेल्या पुरातन (हेरीटेज) एक पिंपळ प्रजातीचे वृक्षाच्या इमारतीवर व परिसरात झुकलेल्या फांद्यांचो कापणी करण्याबाबतचा मंजूरी प्रदान करण्याच्या विषयावर समितीत चर्चा करण्यात आली व चर्चेअंती वरील वृक्षाच्या इमारतीवर, परीसरात व रोडवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकामताने समितीने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 33

**अर्जदाराचे नाव:-** श्री. दिनेश रोडगे.

**अर्जाचा प्राप्त दिनांक:** 25.11.2024

**झाडाची प्रजाती :-** रेनट्री, झाडाची गोलाई 102 इंच, झाडाची वय 99 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** इरा इंटर नेशनल स्कूल जवळ, वम्बलेश्वरी नगर, नागपूर, येथील श्री. दिनेश रोडगे यांच्या घरासमोरील परिसरात असलेल्या पुरातन (हेरीटेज) एक रेनट्री वृक्षाच्या परिसरात व इमारतीवरझुकलेल्या फांद्या छाटणी करण्याच्या विषयावर समितीत चर्चा करण्यात आलीच चर्चेअंती वरील वृक्षाच्या इमारतीवर, परीसरात व रोडवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकामताने समितीने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 34

**अर्जदाराचे नाव:-** सुमित गोयनका.

**अर्जाचा प्राप्त दिनांक:** 23.12.2024

**झाडाची प्रजाती:-** रेनट्री, झाडाची गोलाई- 101 इंच, झाडाची वय- 98 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण**:- गुरुदेव नगर पेट्रोल पंप जवळ, मेन रोड नंदनवन, नागपूर, येथील गुरुदेव नगर पेट्रोल पंप जवळ, मेन रोडलगत पुरातन (हेरीटेज) एक रेनट्री प्रजातीच्या झाडाच्या इमारतीवर झुकलेल्या फांद्यांची कापणी करणे आवश्यक असल्याने वरील झाडाच्या झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याकरीता समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 35**

**अर्जदाराचे नाव:- श्री. सुरेश वंजारी.**

**अर्जाचा प्राप्त दिनांक** 19.12.2024

**झाडाची प्रजाती** :- रेनट्री, झाडाची गोलाई-64 इंच, झाडाची वय- 62 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण** :- प्लॉट नं. 19, ज्योती प्राथमिक शाळा, धन्वंतरी नगर, रमणा मारोती, नागपूर, येथील श्री. सुरेश वंजारी यांच्या घरासमोरील परिसरात असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** एक रेनट्री प्रजातीच्या झाडाच्या इमारतीवर व विद्युत तारेवर झुकलेल्या फांद्या कापणी करणे आवश्यक असल्याने वरील झाडाच्या इमारतीवर व विद्युत तारेवर झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याकरीता समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 36**

**अर्जदाराचे नाव**:- श्री. संजय निसाद.

**अर्जाचा प्राप्त दिनांक**:- 04.12.2024

**झाडाची प्रजाती** :- पिंपळ, झाडाची गोलाई-178 इंच, झाडाची वय-173 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण**:- प्लॉट नं. 586, धम्मदीप नगर, इटाभट्टी चोक, नागपूर येथील श्री. संजय निसाद यांच्या घरासमोरील परिसरात असलेल्या पुरातन (हेरीटेज) एक पिंपळ वृक्षाच्या इमारतीवर व विद्युत तारेवरझुकलेल्या फांद्या छाटणी करण्याबाबतच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील वृक्षाच्या इमारतीवर व विद्युत तारेवर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 37**

**अर्जदाराचे नाव**:- श्री. डॉ. सुरेश शंकर भाके,

**अर्जाचा प्राप्त दिनांक**:- 29.11.2024

**झाडाची प्रजाती** :- आंबा-1, झाडाची गोलाई 56 इंच, झाडाची वय 53 वर्ष (हेरीटेज).

**प्रशासकीय शुल्क** :- 500/-

**झाडाचे विवरण:-** श्रेयस अपार्टमेंट 52, तात्या टोपे नगर, नागपूर येथिल असलेल्या एक पुरातन (हेरीटेज) आंबा एकूण 01 वृक्षाच्या घरावर व परीसरात झुकलेल्या फाद्यांची छाटणी करणे आवश्यक असल्याने वरील वृक्षाच्या घरांवर व परीसरात झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 38

**अर्जदाराचे नाव:- श्री. अभिमन्यु कुचे,**

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 04.01.2025

**झाडाची प्रजाती :-** चिंच-1. झाडाची गोलाई-98 इंच, झाडाची वय 94 वर्ष (हेरीटेज)

**प्रशासकीय शुल्क :-** 500/-

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं 3897 बि, सोनेगांव, नागपूर येथिल असलेल्या एक पुरातन (हेरीटेज) चिच एकूण 01 वृक्षाच्या परीसरात व उंच वाढलेल्या धोकादायक फाद्यांची छाटणी करणे आवश्यक असल्याने वरील वृक्षाच्या घरांवर व परीसरात झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 39

**अर्जदाराचे नाव :-** श्रीमती सिमा पाधे,

**अर्जाचा प्राप्त दिनांक:-** 03.01.2025

**झाडाची प्रजाती :-** आंबा-1, झाडाची गोलाई-55 इंच, झाडाची वय 52 वर्ष (हेरीटेज)

**प्रशासकीय शुल्क :- 500/-**

**झाडाचे विवरण:** प्लॉट में 4, सेंट्रल एक्साइज कॉलोनी, वर्धा रोड, नागपुर, येथिल असलेल्या एका पुरातन (हेरीटेज) आंबा एकूण 01 वृक्षाच्या चरावर व परीसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी फरण्याबाबतच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील वृक्षाच्या विद्युत घरावर व परीसरात झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 40

**अर्जदाराचे नाव:** - श्रीमती. पुनम रामटेके,

**अर्जाचा प्राप्त दिनांक:-** 02.01.2025

**झाडाची प्रजाती:-** आंबा-1. झाडाची गोलाई-90 इंच झाडाची वय 86 वर्ष (हेरीटेज)

**प्रशासकीय शुल्कः**- 500/-

**झाडाचे विवरण**:- प्लॉट नं 2845/0/38, खामला ब्लाक 3, बन्हाडे ले आउट, प्रतापनगर, नागपूर येथिल असलेल्या एक पुरातन (हेरीटेज) आंबा एकूण 01 वृक्षाच्या घरांवर व परीसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याबाबतच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील पृक्षाच्या घरांवर व परीसरात झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची समितीने एकमत्ताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 41

**अर्जदाराचे नाव**:- श्री. अशोक सिंग,

**अर्जाचा प्राप्त दिनांक** :- 03.01.2025

**झाडाची प्रजाती**:- आंबा 2, झाडाची गोलाई 45 व 75 इंच, झाडाची वय 43 व 72 वर्ष

**प्रशासकीय शुल्क**: - 1000/-

**झाडाचे विवरण**:- प्लॉट नं. 347, आनंद सागर सोसायटी, लक्ष्मीनगर, नागपूर येचिल असलेल्या पुरातन (हेरीटेज) आंबा 02, एकूण 02 वृक्षाच्या परीसरात व उंच वाढलेल्या फांद्यांची कापणी करणे आवश्यक असल्याने वरील वृक्षाच्या फांद्या छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 42

**अर्जदाराचे नाव**:- श्री. अजय संपी,

**अर्जाचा प्राप्त दिनांक**:- 08.01.2025

**झाडाची प्रजाती** :- **कडूनिम-1, झाडाची गोलाई 82 इंच, झाडाची वय 78 वर्ष (हेरिटेज)**

**प्रशासकीय शुल्कः**- 500/-

**झाडाचे विवरण** :- प्लॉट नं. 15, कांग्रेस नगर, नागपूर येथिल घर परीसरात असलेल्या पुरातन (हेरीटेज) कडूनिम-। वृक्षाच्या धोकादायक परीसरात झुकलेला असल्याने कोणत्याही प्रकारची हानी होऊ नये करीता सदर वृक्षास जमिनीपासून 15 फुट वरील भागाची कापणी करण्याबाबतच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील पुरातन (हेरीटेज) कडूनिम-1 वृक्षास जमिनीपासून 15 फुट वरील भागाची कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 43

**अर्जदाराचे नाव**:- श्रीमती सुमन रमेश नायडू.

**अर्जाचा प्राप्त दिनांक**:- 06.01.2025

**झाडाची प्रजाती :-** आंबा-1, झाडाची गोलाई 61 इंच, झाडाची वय 59 वर्ष (हेरीटेज)

**प्रशासकीय शुल्क :-** 500/-

**झाडाचे विवरण :-** क्वार्टर नं. 8/8, पाचपावली, नागपूर येथिल असलेल्या पुरातन (हेरीटेज) एक आंबा झाडाच्या घरांवर व विद्युत तारांवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याबाबतच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील पुरातन (हेरीटेज) एक आंबा झाडाच्या घरांवर व विद्युत तारांवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 44**

**अर्जदाराचे नाव:** - श्री. अमर नंदलाल अडवाणी,

**अर्जाचा प्राप्त दिनांक:-** 18.12.2024

**झाडाची प्रजाती :-** वड-1. झाडाची गोलाई-74 इंच, झाडाची वय 71 वर्ष (हेरीटेज)

**प्रशासकीय शुल्क :-** 500/-

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं. 238, कमल फुल चौक, जरीपटका, नागपूर येथिल असलेल्या पुरातन (हेरीटेज) वड झाडाच्या परीसरात, रस्त्यावर झुकलेल्या व मोकळया भुखंडाचे साफसफाई करण्याकरीता फांद्यांची छाटणी करण्यावावतच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील पुरातन (हेरीटेज) वड झाडाच्या परीसरात, रस्त्यावर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 45**

**अर्जदाराचे नाव :-** अतिरीक्त कार्यकारी, अभियंता, ग्राहक सुविधा केंद्र, खामला चोक, नागपुर.

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 01.01.2025

**झाडाची प्रजाती :-** वड-1, झाडाची गोलाई-95 इंच, झाडाची वय 91 वर्ष (हेरिटेज)

**झाडाचे विवरण :-** अतिरीक्त कार्यकारी, अभियंता, ग्राहक सुविधा केंद्र, खामला चौक, नागपूर येथिल असलेल्या पुरातन (हेरीटेज) एक वड झाडाच्या परीसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करणे आवश्यक असल्याने वरील झाडाच्या फांद्या छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 46**

**अर्जदाराचे नाव:-** सौ. सारीका विशाल तिवारी,

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 01.01.2024

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ-1, झाडाची गोलाई 138 इंच, झाडाची वय 132 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** प्लॉट क्र- 84, संघ ग्राउंड जवळ, गांधीनगर, नागपूर येथिल असलेल्या पुरातन (हेरीटेज) एक पिंपळ झाडाच्या परीसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याबाबतच्या विषयावर समेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील पुरातन (हेरीटेज) पिंपळ झाडाच्या परीसरात, झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 47**

**अर्जदाराचे नाव:-** श्री. प्रमोद देशपांडे,

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 03.01.2025

**झाडाची प्रजाती :-** रेन्ट्री-1, झाडाची गोलाई 83 इंच, झाडाची वय 79 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं. 39. गायत्री नगर, आयटी पार्क रोड, प्रताप नगर, नागपूर येथिल असलेल्या पुरातन (हेरीटेज) एक पिंपळ झाडाच्या घरांवर धोकादायक झुकलेल्या फांद्यांची छाटणी करणे आवश्यक असल्याने या झाडाच्या झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 48**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. बालाजी इगर,

**अर्जाचा प्राप्त दिनांक:-** 06.01.2025

**झाडाची प्रजाती :-** रेन्ट्री-1. झाडाची गोलाई 83 इंच, झाडाची वय 79 वर्ष (हेरीटेज)

कडूनिम-2, झाडाची गोलाई -23 व 18 इंच, झाडाची वय 22 व 17 वर्ष (नॉ. हेरीटेज)

सुबाभूळ-1, झाडाची गोलाई10 इंच, इराडाची वय 8 वर्ष (मॉ. हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** भाग्यश्री लेआउट, परसोडी, नागपूर येथिल असलेल्या पुरातन (हेरीटेज) व नॉ. हेरिटेज-3, रेन्द्री-1, कडूनिम-2, सुबाभूळ-1 एकूण 04 झाडाच्या विद्युत दिव्यांवर व विद्युत तारांवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करणे आवश्यक असल्याने या इराडाच्या विद्युत दिव्यांवर व विद्युत तारांवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली

**विषय क्र. 49**

**अर्जदाराचे नाव:-**श्री. राजेश अंबालकर,

**अर्जाचा प्राप्त दिनांक:-** 07.10.2024

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ 1, झाडाची गोलाई-68 इंच, झाडाची वय 65 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण** :- प्लॉट नं-184 ए. कल्पवृक्श हॉस्पीटल, छत्रपती चौक, नागपूर येथिल असलेल्या पुरातन (हेरीटेज) पिंपळ झाडाच्या रस्त्यावर व विद्युत तारांवर झुकलेल्या फांद्यांचो कापणी करणे आवश्यक असल्याने पिंपळ झाडाच्या रस्त्यावर व विद्युत तारांवर झुकलेल्या फांद्यांची कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 51

**अर्जदाराचे नाव**:- श्री. राजेंद्र गाडगे,

**अर्जाचा प्राप्त दिनांक**:- 15.12.2024

**झाडाची प्रजाती** :- रेन्ट्री-01, झाडाची गोलाई-93 इंच, झाडाची वय 69 वर्ष (हेरीटेज)

गुलमोहर-01, झाडाची गोलाई-60 इंच, झाडाची वय 54 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण**:- प्लांट नं. 32 व 33, एलआयसी कॉलोनी, यीवेकानंद नगर, खामला, नागपूर येथिल असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** रेन्ट्री व गुलमोहर अशी एकूण 02 झाडाच्या घरावर व परीसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याबाबतच्या विषयावर समेत साधकबाधक चर्चा होऊन या पुरातन (हेरीटेज) रेन्ट्री व गुलमोहर अशी एकूण 02 झाडाच्या घरावर व परीसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्यास समितीने एकमताने अनुमती प्रदान केलो.

**विषय क्र.** 52

**अर्जदाराचे नाव**:- श्री. हनुमान मंदीर, नागरीक,

**अर्जाचा प्राप्त दिनांक**:- 15.12.2024

**झाडाची प्रजाती** :- वड-01, झाडाची गोलाई-74 इंच, झाडाची वय 70 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण** :- कॉसमॉस टॉउन, त्रीमुर्ती नगर, नागपूर येथिल असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** वड प्रजातीच्या झाडाच्या घरावर व परीसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याच्या विषयावर सभेत साधकबाधक चर्चा होऊन या **पुरातन (हेरीटेज)** वड झाडाच्या घरावर व परीसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्यास समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 53

**अर्जदाराचे नाव**: श्री. साई हरिश,

**अर्जाचा प्राप्त दिनांक**:- 10.01.2025

**झाडाची प्रजाती** :- उंबर-01, झाडाची गोलाई- 99 इंच, झाडाची वय 95 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण**:- प्लॉट नं 17 व 18, लक्ष्मी विहार कॉलोनी, एयरपोर्ट सेट्रे पाईंट हॉटेल मागे, वर्धा रोड, नागपूर येथिल असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** उंबर प्रजातीच्या एकूण 01 झाड धोकादायक घरांवर झुकलेला असल्याने सदर झाडास जमिनीपासून 15 फुट अंतर सोडून वरील भागाची कापणी करणे आवश्यक असल्याने सदर झाडास जमिनीपासून 15 फुट अंतर सोडून वरील भागाची कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली

**विषय क्र. 50**

**अर्जदाराचे नाव**:- श्री. खुशाल नावंडर,

**अर्जाचा प्राप्त दिनांक**:- 15.12.2024

**झाडाची प्रजाती** :- पिंपळ -01, झाडाची गोलाई -55 इंच, झाडाची वय 53 वर्ष (हेरीटेज)

वड -01, झाडाची गोलाई57 इंच, झाडाची वय 54 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण**:- प्लॉट नं. 6. पांडे पांडे लेआउट, गायत्री नगर, आयटी पार्क, नागपूर येथिल असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** पिंपळ व वड एकूण 02 झाडाच्या परीसरात झुकलेल्या फांद्यांची कापणी करण्याबाबतच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील पुरातन (हेरीटेज) पिंपळ व वह एकूण 02 झाडाच्या परीसरात झुकलेल्या फांद्यांची कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 54**

**अर्जदाराचे नाव**:- श्री. प्रज्वल मानवटकर,

**अर्जाचा प्राप्त दिनांक**:- 19.12.2024

**झाडाची प्रजाती** :- पिपळ -01, झाडाची गोलाई -85 इंच, झाडाची वय 80 वर्ष (हेरीटेज)

केशिया-04, झाडाची गोलाई 25 ते 38 इंच, झाडाची वय 23 ते 35 वर्ष (नॉ. हेरीटेज)

**झाडाचे विवरण** :- प्लॉट नं.बि 47/363, हुडको कालोनी, जरीपटका, नागपूर येथिल असलेल्या पुरातन (हेरीटेज) पिंपळ-1, गुलमोहर-4, एकूण 05 झाडाच्या घरावर व विद्युत दिव्यांवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करणे आवश्यक असल्याने झाडाच्या घरावर व विद्युत दिव्यांवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 55

**अर्जदाराचे नाव:-** श्री. सचिव,

**अर्जाचा प्राप्त दिनांक:-** 18.12.2024

**झाडाची प्रजाती :-** गुलमोहर -01, झाडाची गोलाई -75 इंच, झाडाची वय 70 वर्ष (हेरीटेज)

पिंपळ -02, झाडाची गोलाई 38 व 65 इंच, झाडाची वय 35 व 61 वर्ष (हेरीटेज व नॉ.हे.)

कडूनिम -02, झाडाची गोलाई 32 ते 40 इंच, झाडाची वय 30 ते 38 वर्ष (नॉ. हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** अमर ज्योतो बुध्द विहार, हुडको कॉलोनी, जरीपटका, नागपूर येथिल असलेल्या हिवरगुलमोहर-1, पिंपळ -2, कडूनिम-2 प्रजातीच्या एकूण-5 झाडाच्या (2) हेरिटेज व 3 नॉ. हेरिटेज) इमारतीवर व परीसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याबाबतच्या विषयावर सभेत चर्चा करण्यात आली, चर्चा होऊन समितीने वरील नमूद 5 वृक्षाच्या इमारतीवर व परीसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 56

**अर्जदाराचे नाव:-** श्रीमती. के. खस्तो,

**अर्जाचा प्राप्त दिनांक:-** 17.12.2024

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ -01, झाडाची गोलाई 85 इंच, झाडाची वय 80 वर्ष (हेरीटेज)

शेवगा-02, झाडाची गोलाई 28 ते 34 इंच, झाडाची वय 26 व 32 वर्ष (नॉ. हेरीटेज)

बाभुळ-01, झाडाची गोलाई 40 इंच, झाडाची वय 38 वर्ष (नॉ. हेरीटेज)

**झाडाचे विवरण:-** अमर ज्योती बुध्द विहार हुडको कॉलोनी, जरीपटका, नागपूर येथिल असलेल्या हिवर गुलमोहर 1 पिंपळ 2, कडूनिम 2 प्रजातीच्या एकूण 05 वृक्षाच्या (2) हेरिटेज व 3 रिटेन) इमारतीवर व परीसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची मंजूरी प्रदान करण्याबाबतच्या विषयावर सभेत चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन समितीने वरील नमूर 7 वृक्षाच्या इमारतीवर व परीसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 57

**अर्जदाराचे नाव:-** कोमल मनोहर संभूलकर

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 03.01.2025

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ 1. झाडाची गोलाई-138 इंच झाडाची वय 134 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरणः-** दसरा रोड, मांगपुरा, आण्णा भाऊ साठे समान भवन नागपूर येथील अर्जदाराच्या घरासमोरील भागात पुरातन (हेरीटेज) एक पिंपळ प्रजातीच्या झाडाच्या इमारतीवर, विद्युत तारेवर व रोडवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याबाबतच्या विषयावर सभेत साधकाधक चर्चा होऊन सदर झाडाच्या शेजारच्या इमारतीवर, विद्युत तारेवर व रोडवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

उपायुक्त (उद्यान)
तथा
वृक्ष अधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

**प्रशासक**
**तथा**
**अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**